| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | ०३/११/२०२२ |
| नोंदणी दिनांक | : | ०३/११/२०२२ |
| निकाल दिनांक | : | १२/०९/२०२४ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०१ १० ०९ |

**सिएनआर क्र. MHLC30-000269-2022**

**उपदान प्रदान अधिनियम १९७२ अन्वये नियंत्रण प्राधिकारी तथा न्यायाधिश, कामगार न्यायालय, अकोला.**

**(श्री. एस. के. बांगड यांचेसमोर)**

**पि.जि.ए. कं. १४८/२०२२**

**नि. ओ–४**

**पार्वताबाई लक्ष्मण डाबेराव,**
वय ६० वर्षे रा. वणी रंभापुर,
अकोला, ता.जि. अकोला. ... **अर्जदार**

.. **विरूध्द** ..

१) **कुलसचिव,**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ
अकोला.

२) **मुख्यबिजोत्पान अधिकारी साहेब,**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ
मुख्यबिजोत्पादन अधिकारी कार्यालय, वणी
रंभापुर, मुर्तिजापुर रोड अकोला. ता.जि.अकोला.

३) **अन्वी विभाग प्रमुख साहेब,**
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ
अन्वी विभाग कार्यालय, वणी
रंभापुर, मुर्तिजापुर रोड अकोला. ता.जि.अकोला. ... **गैरअर्जदार**

**कोरम :— श्री एस. के. बांगड, न्यायाधिश, का. न्या., अकोला.**

**अर्जदारातर्फे प्रतिनिधी :— श्री. आर. एन. गायकवाड, प्रतिनिधी.**

**गैरअर्जदारांतर्फे विधीज्ञ :— श्री. एम. के. ठोसर, ॲड.**

## न्यायनिर्णय

**(दिनांक:— १२/०९/२०२४)**

**०१.** अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे असे की, अर्जदार ही गैरअर्जदारांकडे सन १९७६ पासून ते दि. १२/१२/२०२१ पर्यंत कामास होते. अर्जदारास बंद करतेवेळी रू.२९३/— दररोज मजुरी देय होती. यानुसार अर्जदार यांनी सलग ४५ वर्षे काम केले आहे. त्यामुळे अर्जदार हे उपदानापोटी रू. १,९७,७७५/— इतकी रक्कम मिळण्यास पात्र आहे. त्यापैकी गैरअर्जदाराने रु.८९,१००/— यापूर्वी उपदानापोटी दिले आहे. करीता रू.१,०८,६७५/— इतकी उपदानाची थकीत रक्कम व्याजासहीत मिळणेसाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०२.** गैरअर्जदार यांनी त्यांचे लेखी म्हणणे **नि. सी—५** वर दाखल करून अर्जदाराने केलेली सर्व कथने नाकारली आहेत. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांनी त्यांच्या जबाबासोबत अर्जदार यांनी काम केलेला वर्षनिहाय कामाचा तक्ता दाखल केला असून अर्जदार यांनी ४५ वर्षे गैरअर्जदाराकडे काम केलेले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार यांनी कधीही ४५ वर्षे सलगपणे काम केलेले नाही. कायद्यानुसार त्यांना संपुर्ण उपदानाची रक्कम त्यांना देण्यात आली असून, त्यांनी अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

**०३.** अर्जदार व गैरअर्जदार यांच्या म्हणण्यावरून **नि. ओ—३** वर मुद्दे कायम करण्यात आले होते. सदरचे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ. क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडे सलग कामावर होते हे सिध्द करतात काय? | होकारार्थी. |
| २. | अर्जदार त्यांच्या मागणीप्रमाणे सदरची उपदानाची रक्कम मिळणेस पात्र आहेत का? | अंशतः होकारार्थी. |
| ३. | काय आदेश? | अंतिम निकालाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रं. १ ते ३ करिता :—**

**०४.** अर्जदार यांनी त्यांच्या अर्जातील कथनांचे पुष्ठ्यर्थ त्यांचे पुराव्याचे शपथपत्र **नि. यु—७** वर दाखल केले आहे. अर्जदार यांनी नोटीस दि. ११/१०/२०२२, कार्यालयीन आदेश दि. २९/०८/२०१६ व दि. १७/०६/२०१७, यांच्या प्रती दाखल केल्या आहेत. याउलट, गैरअर्जदाराने अर्जदाराने केलेल्या कामाचे माहितीपत्रक **नि. सी.—७** वर, उपदानाची रक्कम मिळाल्याची पोचपावती दाखल केली आहे. अर्जदार यांनी दाखल केलेले कागदपत्र गैरअर्जदाराने मान्य केले व गैरअर्जदाराने दाखल केलेले कागदपत्र अर्जदाराने मान्य केले. दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकला असता अर्जदारानी ज्या कालावधीसाठी

उपदानाच्या रकमेची मागणी केली आहे त्याकाळातील उपदानाच्या रकमेस पात्र आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे.

**०५.** अर्जदार ही गैरअर्जदाराकडे सलग सेवेत असल्याबाबत गैरअर्जदाराने नाकारले आहे. सन १९७६ ते सन २०२१ पर्यंतचे माहितीपत्रक अर्जदार यांनी मान्य केले आहे. त्यानुसार अर्जदार यांनी कामावर लागलेल्या तारखेपासून दरवर्षी १८० दिवसापेक्षा जास्त दिवस काम करून २४ वर्षाच्या कालावधीसाठी उपदानास पात्र असल्याचे सिध्द केले आहे. त्यामुळे अर्जदार हे २४ वर्षाच्या कालावधीसाठी उपदानास पात्र असल्याचे सिध्द होत आहे.

**०६.** अर्जदार यांनी गैरअर्जदाराकडे सलगपणे २४ वर्षे काम केल्याचे सिध्द झाले आहे. अर्जदार यांना उपदानापोटी मिळणा—या रकमेपैकी गैरअर्जदाराने रू. ८९,१००/— अर्जदारास दिल्याचे दिसून येत आहे. गैरअर्जदाराने उपदानाची रक्कम रू. ८९,१००/— कशी काढली याबद्दल काहीही कथन केले नाही अगर पुरावा दिला नाही. अर्जदार यांनी केलेल्या सेवेचा विचार केला असता, त्यांना उपदानापोटी २८०.८४ X १५ X २४ = १,०१,१०३/— मिळाले पाहिजेत. त्यामुळे गैरअर्जदाराने दिलेली रक्कम वजा करता अर्जदारास उपदानापोटी शिल्लक राहिलेली रक्कम रू. १२,००३/— बाकी आहेत.

**०७.** गैरअर्जदाराने अर्जाची नोटीस मिळाल्यानंतरही अर्जदारास देणे असलेली रक्कम न्यायालयात जमा केली नाही. त्यामुळे उर्वरित रकमेवर अर्जदार द.सा.द.शे. १० टक्के प्रमाणे व्याज मिळण्यास अर्ज दाखल तारखेपासून पात्र आहे. म्हणून मुददा क्रं. १ चे उत्तर होकारार्थी, मुददा क्रं. २ चे उत्तर अंशतः होकारार्थी देवून मुद्दा क्रं. ३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

# **आदेश**

१. अर्ज खर्चासहीत अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदारांनी उपदानाची रक्कम रू. १२,००३/— अर्ज दाखल दि. ०३/११/२०२२ पासून संपुर्ण रक्कम वसुल होईपर्यंत द.सा. द.शे. १० टक्के प्रमाणे व्याज द्यावे.

३. उपदान प्रदान (महाराष्ट्र) नियम, १९७२ अन्वये गैरअर्जदार यांना नमुना 'आर' अन्वये नोटीस पाठवावी.

SATISH KACHRULAL BANGAD

Digitally signed by SATISH KACHRULAL BANGAD
Date: 2024.09.12 17:58:26 +0530

**(एस. के. बांगड)**
**नियंत्रण प्राधिकारी, उपदान प्रदान अधिनियम**
**तथा न्यायाधिश,**
**कामगार न्यायालय, अकोला**

**दिनांक :— १२/०९/२०२४.**

युक्तीवाद केल्याची तारीख : १२/०९/२०२४.
निकाल श्रुतलेखन केल्याची तारीख : १२/०९/२०२४.
निकाल तपासलेची व सही केल्याची तारीख : १२/०९/२०२४.